Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

July -2021

ISSUE No- 230 (A)

## Panchayat Raj System




**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr. Sunil P.Washimkar
Principal
Mahatma Jyotiba Fule
College of Social Work, Yavatmal

**Editor**
Dr. Ganesh R.Gadekar
Assistant Professor
Mahatma Jyotiba Fule
College of Social Work, Yavatmal

B.Aadhar

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with CamScanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) -7.675, Issue NO, 300 (CCC ) A
ISSN : 2278-9308
July, 2021



| | | |
|---|---|---|
| 21 | महात्मा गांधी और भारत में पंचायती राज व्यवस्था<br>प्रा. डॉ. उमावती मोहनचंद्र पवार | 100 |
| 22 | पंचायत राज व्यवस्था आणि शासकीय योजना (उमेद योजना) कु.दीपाली विठ्ठलराव तंबाखे | 104 |
| 23 | पंचायतराज आणि स्त्रियांची भूमिका प्रा.सोनाली रमेश खांडेकर | 109 |
| 24 | ७३ वी घटनादुरुस्ती आणि ग्रामीण विकास : एक विश्लेषणात्मक अध्ययन<br>डॉ. राजेंद्र ओ. बेलोकार | 114 |
| 25 | पंचायतराज संस्थाच्या सक्षमीकरणातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची भूमिका<br>प्रा.डॉ.प्रदीप जगताप | 118 |
| 26 | पंचायत राज व स्त्री सबलीकरण प्रा. डॉ. प्रमिला डी. भोयर | 126 |
| 27 | ग्रामीण विकासात स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका : एक अध्ययन<br>विशेष संदर्भ:वाशिम जिल्हा सहा.प्रा. ए.टी. वाघ | 130 |
| 28 | पंचायतराज व्यवस्था : एक चिकित्सक अध्ययन<br>प्रा.डॉ. सुभाष दौलतराव उपाते | 135 |
| 29 | पेसा कायदा आणि पंचायत राज व्यवस्था<br>कु निता दत्तू घडलिग/कु. स्नेहा सोन्याबापू सोळंके | 140 |
| 30 | ७३ वी घटना दुरुस्ती व पंचायत राज्य प्रा. योगेश एस. मुनेश्वर | 144 |
| 31 | पंचायत राज व्यवस्था व ७३ वी घटना दुरुस्ती **दीपक आर. आटे** | 147 |
| 32 | पंचायत राज व्यवस्था आणि ऐतिहासिक विकास **डॉ. प्रांजू हिरेखण** | 151 |
| 33 | ग्रामीण विकासात ग्रामसभेची भूमिका सहा. प्रा. वसंता सिताराम वंजारी | 157 |
| 34 | पंचायत राज आणी ७३ घटनादुरूस्ती प्रा.डॉ.संतोष.एस.मिसाळ | 163 |



Scanned with CamScanner

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 300 (CCC ) A
ISSN : 2278-9308
July 2021

# 'पंचायतराज संस्थाच्या सक्षमीकरणातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची भूमिका'

प्रा.डॉ.प्रदीप जगताप
दादा पाटील महाविद्यालय,कर्जत.जि. अहमदनगर
मो. नं. ७८४१८५३३११ ,jpradeep.sonu@gmail.com.

**प्रस्तावना**

लोकशाही विकेंद्रीकरणात आणि ग्रामीण भागाचा विकास करून ग्रामीण भागाच्या पुनर्रचनेच्या कार्यात पंचायतराज संस्थाची भूमिका महत्वपूर्ण अशी आहे. पंचायतराज संस्थामुळे सत्तेच्या केंद्रीकरणाला आळा बसून राजकीय सत्ता ग्रामीण समाजाच्या शेवटच्या स्तरापर्यत पोहोचली आहे, त्यातून लोकशाहीचे सक्षमीकरण व्हायला मदत झाली आहे. 'लोकांची सत्ता' हे लोकशाहीचे तत्व पंचायतराज संस्थामुळे प्रत्यक्षात यायला मदत झाली, ज्यामुळे लोकांचा राजकीय सहभाग वाढला आहे. पंचायतराज संस्थाच्या माध्यमातून स्थानिक पातळीवरील नेतृत्वाचा विकास झाला. स्थानिक पातळीवरील नेतृत्वाच्या सहभागातून ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळाली. पंचायतराज संस्थामधील आरक्षणाच्या तरतूदीमुळे सामाजिक न्याय प्रस्थापित व्हायला मदत झाली. पंचायतराज संस्थाच्या सक्षमीकरणासंदर्भात सत्ताधारी आणि विरोधीपक्ष म्हणूनही राजकीय पक्षाची भूमिका महत्वपूर्ण अशी असते.पंचायतराज संस्थांना जास्तीत जास्त अधिकार देणे, त्यामधील लोकांचा सहभाग वाढावा, त्याच्या माध्यमातून स्थानिक भागाचा विकास व्हावा, स्थानिक नेतृत्वाला संधी मिळावी या संदर्भात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने महत्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. सदर शोधनिबंधात महाराष्ट्रातील पंचायतराज संस्थांच्या सक्षमीकरणातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची भूमिका याचा आढावा घेतला आहे.

**उद्दिष्टे**

१) पंचायतराज संस्थाच्या सक्षमीकरणातील राजकीय पक्षाची भूमिका समजून घेणे.

२) महाराष्ट्रातील पंचायतराज संस्थांच्या सक्षमीकरणातील राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे योगदान अभ्यासणे.

३) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नेतृत्वाने महाराष्ट्रातील पंचायतराज संस्थाच्या सक्षमीकरणासंदर्भात घेतलेले निर्णय अभ्यासणे.

**गृहितके**

१) पंचायतराज संस्थांच्या सक्षमीकरणात राजकीय पक्षांची भूमिका महत्वपूर्ण आहे.

२) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने पंचायतराज संस्थांच्या सक्षमीकरणात महत्वपूर्ण योगदान दिले आहे.

३) पंचायतराज संस्थांना अधिकचे अधिकार देणे, विविध विकास योजना राबवून पंचायतराज संस्थांच्या माध्यमातून स्थानिक भागाचा विकास करणे, महिला आरक्षण वाढविणे, स्थानिक नेतृत्वाला प्रबोधन करून ते सक्षम बनविणे या माध्यमातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने महाराष्ट्रातील पंचायतराज संस्थांचे सक्षमीकरण केले आहे.

**संशोधन पद्धती**

सदर शोधनिबंधासाठी प्राथमिक साधनांचा तसेच दुय्यम साधनांचा अवलंब केला आहे. पंचायतीराज व्यवस्था संदर्भातील संदर्भ ग्रंथ, मासिके, दैनिक वर्तमान पत्रातील बातम्या, पक्षाचे अहवाल, माहिती पुस्तीका, प्रकाशित लेख इत्यादी साधने वापरली आहेत.



Scanned with CamScanner

पंचायतराज व्यवस्था आणि राजकीय पक्ष

लोकशाही प्रकियेमध्ये राजकीय पक्षांचे महत्व अनन्यसाधारण असे आहे. निर्णयप्रक्रियेतील सहभाग, कायदेनिर्मिती, राजकीय समाजीकरण, प्रबोधन, आंदोलन, प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग या माध्यमातून राजकीय पक्ष लोकशाहीत विविध भूमिका पार पाडत असतात. आपला पाया भक्कम करण्यासाठी स्थानिक नेतृत्वाला नेतृत्व करण्याची संधी देणे, लोकांचा राजकीय सहभाग वाढविणे असा प्रयत्न राजकीय पक्ष करीत असतात. पंचायतराज संस्थांमधील राजकीय पक्षाचा सहभाग हा त्या पक्षाचा स्थानिक आधार असतो. त्यामुळे राजकीय पक्ष पंचायतराज संस्थांच्या सक्षमीकरणात महत्वाची भूमिका पार पाडत असतात. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षही त्यास अपवाद नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने महाराष्ट्रातील पंचायतराज संस्थांना सक्षम करून आपला राजकीय पाया मजबूत करण्याचा प्रयत्न केला आहे. ग्रामपंचायत अपवाद वगळता इतर पंचायतराज संस्थांमध्ये म्हणजेच पंचायत समिती, जिल्हा परिषद यामध्ये राजकीय पक्ष प्रत्यक्ष सहभागी होत असतो.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने महाराष्ट्रातील पंचायतराज संस्थांच्या सक्षमीकरणासंदर्भात पुढील निर्णय घेतले आहेत.

१) जिल्हा परिषदांकडे योजना हस्तांतरीत :—

महाराष्ट्रातील पंचायतराज संस्था सक्षम बनविण्याच्या उद्देशाने जिल्हा परिषदांच्या अधिकारात वाढ करण्याचा महत्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला. यासाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे तत्कालीन ग्रामविकास मंत्री मा. आर. आर. पाटील यांच्या प्रयत्नातून राज्यघटनेच्या अकराव्या परिशिष्टात नमुद केलेल्या अधिकार विषयांपैकी आरोग्य, शिक्षण, समाजकल्याण, रस्ते व बांधकाम या क्षेत्रातील ९ विभागांच्या १२२ जिल्हास्तरीय योजना, महाराष्ट्र सरकारने जिल्हा परिषदेकडे वर्ग केल्या. हा महत्वपूर्ण निर्णय २६ सप्टेंबर २००० रोजी महाराष्ट्र राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. लोकांना अधिक अधिकार देण्याच्या दृष्टीने हा निर्णय महत्वपूर्ण आहे.त्याचबरोबर राज्यशासनाकडील सुमारे २९ हजार कर्मचारी आणि राज्यशासनाच्या वार्षिक अर्थसंकल्पातील साधारणत: ४० ते ४५ टक्के इतका निधीही जिल्हा परिषदांकडे हस्तांतरीत करण्यात आला. वरील निर्णयानुसार राज्यशासनाच्या निरनिराळया खात्यांच्या ज्या महत्वपूर्ण योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित झाल्या आहेत त्यात कृषी खात्याच्या सर्वात जास्त ४३ योजना आहेत. जिल्हा परिषदांच्या आधिकारात वाढ करण्याचा हा निर्णय पंचायतराज व्यवस्थेला बळकटी आणण्याच्या दृष्टीने उचललेले महत्वपूर्ण पाऊल म्हणता येईल.

यातून समाज कल्याण, महिला व बालविकास, ग्रामीण पाणी पुरवठा, सार्वजनिक आरोग्य, कृषी, पशुसंवर्धन आणि सांस्कृतिक कार्य या खात्यांच्या योजना जिल्हा परिषदांकडे स्थानांतरीत केल्या गेल्या. महिला आणि बाल कल्याण विभागाच्या कामधेनू योजना, देवदासी निर्वाह अनुदान, व्यावसायिक शिक्षणासाठी मुलींना विद्यावेतन इत्यादी १० योजना जिल्हा परिषदांकडे स्थानांतरीत केल्या गेल्या. एकात्मिक बाल विकास योजनेतील पोषण आहार योजना स्थानांतरीत करण्यात आल्या. आरोग्य सेवेतील प्राथमिक आरोग्य केंद्रे, हिवताप निर्मूलन, अंधत्व निवारण, शालेय आरोग्य, लोकसंख्या धोरण या योजनांची अंमलबजावणी जिल्हा परिषदांकडे सोपविण्यात आली.या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थामधील जिल्हा परिषद ही संस्था अधिकारांच्या बाबतीत सक्षम झालेली दिसते. तसेच राज्यावरील विकासात्मक कामाचा ताण कमी झाला आहे. यामुळे सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन खरी सत्ता लोकांच्या हाती येवून लोकांचा सहभाग वाढला आहे. (करडेकर अनिल, २००९:३१४—३१५ )

२) महिलांना झेंडावंदनाचा अधिकार :–

राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष मा. शरद पवार हे शाहू, फुले, आंबेडकर यांचे कृतीशील वारसदार आहेत. त्यांचे अनुयायी म्हणून काम करीत असताना मा. आर.आर. पाटील यांनी त्यासाठी आग्रही भूमिका सतत घेतली. स्थानिक स्वराज्य संस्थामधील पदाधिकारी महिलांना झेंडावंदनाचा अधिकार नाकारला जात होता. त्यासंदर्भात तत्कालीन ग्रामविकासमंत्री मा.श्री.आर.आर. पाटील यांना एका महिला सरपंचाचे पत्र आले होते. त्यामध्ये आम्हाला सरपंच केले जातंय, पण १ मे, २६ जानेवरी, १५ ऑगस्टला झेंडावंदन मात्र आमच्या हस्ते होत नाही. कोणत्यातरी पॅनलचा प्रमुख येतोय, कुठं नवरा येतोय, तोच झेंडावंदन करतोय असे नमुद केले होते. याचा विचार करून महिलांना अधिकार देण्याच्या संदर्भात महाराष्ट्र सरकारने निर्णय घेवून ज्या गावामध्ये सरपंच महिला आहेत, त्या गावामधला पुरूष जर झेंडयाच्या दोरीला हात लावेल, तर सरळ तुरूंगात घालू, फौजदारी गुन्हे नोंद करू अशा पद्धतीचे परिपत्रक काढले. त्यातून महिलांना झेंडावंदनाचा अधिकार दिला गेला. पुरोगामी महाराष्ट्राला शोभेल असा हा निर्णय होता. त्या निर्णयामुळे महिलांचे राजकिय प्रक्रियेमधील स्थान उंचावल्याचे दिसून येते. महिलांचा राजकीय सहभाग वाढविण्यासाठी व महिलांचे सबलीकरण होण्यासाठी हे महत्वाचे पाऊल होते. हा पुरोगामी निर्णय राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते श्री. आर.आर. पाटील यांनी घेतला.(राष्ट्रवादी,मार्च,२०१५:३२—३३)

३) नगराध्यक्षांचा कार्यकाल अडीच वर्ष :–

महापौर आणि जिल्हा परिषद अध्यक्षांच्या धर्तीवर नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्षांचा कार्यकाल अडीच वर्षे करण्याचा निर्णय १३ सप्टेंबर २००६ रोजी घेण्यात आला. हा निर्णय घेण्यामध्ये तत्कालीन ग्रामविकासमंत्री श्री. विजयसिंह मोहिते — पाटील यांचा महत्वपूर्ण सहभाग होता. नगराध्यक्षांची थेट निवड करण्याचा निर्णय रद्द करण्यात आला असून यापुढे नगरसेवकांमधूनच नगराध्यक्षांची निवड केली जाणार आहे. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. तसेच निवड झाल्यावर एक वर्ष तरी नगराध्यक्षांच्या विरोधात अविश्वास आणता येणार नाही. अविश्वासाचा ठराव मांडण्यासाठी एकूण सदस्यसंख्येच्या ५० टक्के सदस्यांच्या स्वाक्षरींचे पत्र द्यावे लागेल. अविश्वासाचा ठराव मंजूर होण्याकरीता ३/४ सदस्यांनी विरोधात मतदान करण्याचे बंधन ठेवण्यात आले आहे. एकदा ठराव नामंजूर झाल्यावर पुन्हा अविश्वासाचा ठराव मांडता येणार नाही. या निर्णयामुळे नगरपालिकांच्या सक्षमीकरणाला हातभार लागला आहे. (करडेकर अनिल, २००९:३९०)

४) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान :–

हे अभियान सुरू करण्यामध्ये तत्कालीन ग्रामविकासमंत्री, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते मा. आर.आर. पाटील यांचा सिंहाचा वाटा आहे. या अभियानाची सुरूवात २ ऑक्टोबर २००० रोजी करण्यात आली. स्वच्छतेकडून समृद्धीकडे हा मंत्र घेवून ग्रामीण भागात स्वच्छता करण्यासाठी ग्रामस्वच्छता अभियान राबविणे आणि ग्रामसफाई पुरते हे अभियान मर्यादित न ठेवता यातून लोक चळवळ उभारणे हा या अभियानाचा हेतू होता.लोकांना प्रोत्साहन देण्यासाठी या अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छग्राम स्पर्धा सुरू केली आहे. या अभियानास लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद प्राप्त झाला.

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानातून राज्य स्वच्छतेकडून समृद्धीकडे वाटचाल करीत असून गावागावात स्वच्छता, आरोग्य, एकता व श्रमदान या गोष्टी जोपासल्या जात आहेत. गावागावामध्ये ऐक्य निर्माण होण्यास हे अभियान कारणीभूत ठरले आहे. ग्रामीण भागाची स्वच्छतेतून समृद्धीकडे वाटचाल करण्याबरोबच गावा गावात स्वच्छता, आरोग्य, एकता व श्रमदान या गोष्टी रूजविण्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे महत्वपूर्ण योगदान आहे. हे अभियान ग्राम सफाई एवढयावरच मर्यादित न राहता त्या अभियानातून स्वच्छतेची एक लोक चळवळ निर्माण झाली आहे.



Scanned with CamScanner

ISSN : 2278-9308
July 2021

गावातील लोकांमध्ये असणारे धर्मभेद, जातीभेद, पक्षभेद बाजूला पडून लोक या अभियानात एकत्र येताना दिसत आहेत. त्यातून गावकऱ्यांमध्ये व्यापक जनजागृती, उत्साह व एकी निर्माण झाली. ग्रामस्वच्छता अभियानाच्या माध्यमातून स्वच्छतेचा संस्कार तर रूजवला गेलाच, पण त्याचबरोबर सामाजिक ऐक्य, सर्वधर्मसमभाव, थोरांपासून पोरांपर्यंत आणि महिलांपासून मुलींपर्यंत सर्वांनी उत्स्फूर्तपणे दिलेल्या सहभागामुळे सहकार्याची भावनाही वृद्धिंगत झाली. ग्रामस्वच्छता अभियानात राज्य पातळीवरील प्रथम क्रमांक मिळवलेल्या धामणेर गावातील कार्यक्रमात बोलताना तत्कालीन ग्रामविकासमंत्री मा. आर.आर. पाटील म्हणतात,'ग्रामस्वच्छता झाली आता समृद्धीकडे चला. मी स्वच्छता अभियान सुरू करताना 'स्वच्छतेतून समृद्धीकडे' असे ब्रीदवाक्य डोळयासमोर ठेवले होते; परंतू समृद्धीचे काय? आपण खरोखरच समृद्ध झालो असतो, तर कर्जबाजारपणामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असत्या का ? कुपोषण झाले असते का? आजही दारिद्रय, अंधश्रद्धा व व्यसन हे प्रश्न आपल्यासमोर उभे आहेत. तेव्हा आता स्वच्छता झाली आहे. गावस्तर घटक मानून स्वत:वर विश्वास ठेवून स्वत:च्या व गावाच्या समृद्धीसाठी कामाला लागा. (दै.सकाळ, ४ जानेवारी २००५)

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानामध्ये शौचालयाची निर्मीती, सांडपाण्याची व्यवस्था, कुटूंब नियोजन, कचरा निर्मूलन या कामांचा समावेश होतो. तसेच या अभियानांतर्गत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्वच्छग्राम स्पर्धा सुरू केल्याने आज असंख्य गावे हागणदारीमुक्त झाली आहेत. (साळुंखे श्रीधर,२००७:७२–७३) अलिकडेच महाराष्ट्र राज्य हागणदारीमुक्त म्हणून घोषित केले त्या कामाची सुरूवात मा.आर.आर. पाटील यांनी केली होती हे कोणीही नाकारू शकत नाही. महाराष्ट्रातील खेडयापाडयात स्वच्छता नांदावी, स्वच्छतेमागून समृद्धी यावी असे जे स्वप्न संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या माध्यमातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या आघाडी सरकारने पाहिले होते त्याला हागणदारीमुक्त महाराष्ट्राच्या माध्यमातून फळे आल्याचे दिसून येते.

संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानामुळे बहुतांश आजार हे अशुद्ध पाणी, अस्वच्छ परिसर आणि वैयक्तिक स्वच्छतेच्या आभावाने होतात हे लक्षात आल्याने शुद्ध आणि सुरक्षित पिण्याचे पाणी, घराची स्वच्छता आणि अन्न काळजी, वैयक्तिक स्वच्छता, परिसर स्वच्छता, सांडपाण्याचे नियोजन आणि घनकचऱ्याचे व्यवस्थापण, मानवी मलमूत्राची विल्हेवाट यासारख्या विभागात काम करून गावांनी अतिशय उत्स्फुर्तपणे ग्रामविकासाचा पाया मजबूत केला. यातून गावाच्या सामाजिक तसेच आर्थिक विकासाला गती मिळाली. याच्या माध्यमातून गावस्वच्छता, शाळा व आंगणवाडयांची स्वच्छता, सार्वजनिक इमारती, गुरांचे गोठे, रस्ते दुरूस्ती, रस्ते सफाई, पाणी शुद्धता, सुदृढ बालक स्पर्धा, माता–बाल संगोपन, साथीचे रोग प्रतिबंधक उपाययोजना यासारख्या अनेक कामांना गती मिळाली.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाच्या माध्यमातून सामाजिक एकतेचा संदेश घेवून या अभियानातून अनेक गावे विकासाच्या दिशेने जाऊ लागली. राज्याची स्वच्छतेची टक्केवारी १९ टक्यांवरून ६५ टक्क्यांपर्यंत वाढली ती याच यशस्वी अभियानामुळे. त्रिस्तरीय पंचायत राजव्यवस्थेत शासन अनुदानावर विसंबून न राहता लोकसहभागातून फार मोठया प्रमाणात ग्रामविकास होतो हे या अभियानाने दाखवून दिले आणि गावं एकादिलाने, एकामताने विकासाच्या कामाला लागली. राज्यशासनाच्या या उपक्रमाची दखल युनिसेफ आणि डब्ल्युएसपी सारख्या बाहय साहाय्य करणाऱ्या संस्थांनी देखील घेतली. उत्कृष्ट लोकसहभागाबद्दल राज्यशासनाच्या या उपक्रमाला Indian Express Innovation Award ने सन्मानित करण्यात आले. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाला मिळालेले यश पाहून केंद्र सरकारने देशपातळीवर निर्मलग्राम नावाची योजना राबविण्यास सुरूवात केली.



Scanned with CamScanner

५)यशवंत ग्रामसमृद्धी योजना :–

सन २००२–०३ या आर्थिक वर्षापासून राज्यात यशवंत ग्रामसमृद्धी योजना राबविण्यास सुरूवात केली. गावातील लोकांना विश्वासात घेण्यासाठी ही योजना सुरू केली. ज्यांच्यासाठी योजना राबवायची आहे त्यांचा सहभाग निर्णय प्रक्रियेत वाढवून त्यांना सक्रिय करणे हा या योजनेचा उद्देश आहे. ही योजना सुरू करण्याचे श्रेय ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते, तत्कालीन ग्रामविकासमंत्री श्री. आर.आर. पाटील ऊर्फ आबा यांना जाते. ग्रामपंचायत क्षेत्रातील विकास कामे लोकांच्या सहभागाने, लोकवर्गणीच्या माध्यमातून ग्रामपंचायतीने लोकांच्या सहकार्याने करणे, नियोजनात व निर्णय प्रक्रियेत लोकांचा सहभाग घेणे, लोकवर्गणी सरपंच व ग्रामसेवक यांच्या संयुक्त नावे राष्ट्रीयीकृत बॅंकेत खाते उघडून जमा करणे, ग्रामपंचायतीने स्थानिक पातळीवर लोकवर्गणीच्या स्वरूपात ५ रू प्रति माणशी जमविणे, नियंत्रणासाठी स्थापन करावयाच्या समित्यांचे अध्यक्ष/उपाध्यक्षांची निवड ग्रामसभेच्या मान्यतेने करणे, प्रत्येक कामासाठी समिती यात ४० टक्के महिला व नियमानुसार अनुसूचित जाती जमातींसाठी प्रतिनिधीत्व देणे ही या योजनेची वैशिष्ट्ये आहेत.

यशवंत ग्राम समृद्धी योजनेचा मुख्य उद्देश लोकांच्या सहभागातून ग्राम समृद्धी हा आहे. त्याचबरोबर विविध योजनांमध्ये गावकऱ्यांचा सहभाग वाढविणे, निर्णय प्रक्रियेत लोकांना सक्रिय करून योजना यशस्वी करणे, राज्यातील विकासकामांची माहिती प्रत्यक्षात गावापर्यंत पोहचविणे आणि गरज असलेली कामे प्राधान्याने करणे हे या योजनेत अपेक्षित आहे. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष आणि राष्ट्रीय कॉंग्रेस पक्षाच्या माध्यमातून ग्रामीण भागाच्या पायाभूत सुविधामध्ये वाढ करण्यासाठी यशवंत ग्राम समृद्धी योजना सुरू करण्यात आली.या योजनेंतर्गत ग्रामीण विकासाची निरनिराळया प्रकारची यात गावांतर्गत रस्ते, गटारी नाली, अंगणवाडी, इमारती, दहन व दफनभूमी, बसथांबा शेड, काटेरी तारांशिवाय कुंपणे, गाव व वाडयांच्या रस्त्यावरील विद्युतीकरणाची कामे, वाचनालय, व्यायामशाळा अशी २२३९३ कामे घेण्यात आली. त्यापैकी २२०९५ कामे पूर्ण झाली.या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सन २००८ – ०९ पर्यंत १२३७.२१ कोटी निधी जिल्हा परिषदांना उपलब्ध करून देण्यात आला होता. या योजनेमुळे पायाभूत सुविधा निर्माण झाल्या. त्यामुळे ग्रामीण लोकांचे जीवनमान उंचावण्यास मदत झाली आहे असे म्हणता येईल. (लोकराज्य, एप्रिल २०१२:४७)

६) जलस्वराज्य योजना :–

ग्रामीण भागातील पाणी पुरवठयाचा दर्जा आणि पर्यावरणास पूरक स्वच्छता सेवा सुधारणे या उद्देशाने कॉंग्रेस – राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या आघाडी सरकारने जलस्वराज्य योजना सप्टेंबर २००३ पासून सुरू केली आहे. प्रत्येक गावाला आणि गावातील प्रत्येकाला शुद्ध व पुरेसे पाणी सातत्याने, समूह शक्तीतून प्राप्त व्हावे, स्वच्छ ग्राम परिसर, निर्मळ शरीर व आरोग्यदायी जीवन यासाठी आवश्यक सुविधा, माहिती व कौशल्ये उपलब्ध व्हावीत आणि जल आणि स्वच्छतेच्या लोकाभिमुख प्रकल्प अंमलबजावणीतून इतर ग्रामस्तरीय मूलभूत सुविधा स्वप्रयत्नातून प्राप्त करून घेण्याची गावाला सवय लागावी असा उद्देश जलस्वराज्य योजनेचा आहे. जलस्वराज्य प्रकल्प हा दोन टप्प्यात राबविला आहे. २००३–२००९ हा पहिला टप्पा असून पहिल्याच यशस्वीतेनुसार २००९–२०१२ हा दुसरा टप्पा मंजूर करण्यात आला. लोकसहभागातून पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या माध्यमातून संपूर्ण ग्रामविकास म्हणजेच 'आमचा विकास आमच्या हाती' ही भावना जागृत करण्यासाठी आवश्यक त्या खालील सोयीसुविधा प्रकल्पात अंतर्भूत होत्या.

१) ग्रामीण पाणी पुरवठा
२) ग्रामीण स्वच्छता



Scanned with CamScanner

३) महिला सबलीकरण
४) निवडक ग्रामपंचायतींना लोकसहभागातून इतर विकास क्षेत्रासाठी सहाय्य
५) निवडक जिल्हा परिषदांना सहाय्य
६) भुजल साठा क्षेत्र व्यवस्थापन पथदर्शी प्रकल्प
७) जिल्हा, ग्राम स्तरावर नव्या पद्धतीने काम करण्यासाठी क्षमता वाढ
८) देखभाल व पथदर्शी प्रकल्प

(Jal Swarajya review – cse,IIT, Bombay)

'आमचं गाव आमचं पाणी' या विचारातून ग्रामस्थांनी एकत्र येऊन शासनाच्या सहकार्याने आपल्या गावच्या पिण्याच्या पाण्याचा आणि स्वच्छतेचा प्रश्न सामुहिकरित्या सोडविण्यासाठी जलस्वराज्य प्रकल्प राबविण्यात आला. योजनेच्या सुरूवातीपासून जून २०११ पर्यंत ११.२७ लाख कुटूंबांना पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या सुविधा उपलब्ध केल्या असून त्यासाठी १,२२४.७६ कोटी इतका खर्च केला.या योजनेच्या यशस्वी अंमलबजावणीमुळे ३००७ ग्रामपंचायती व ५११९ गावे, वाडी, वस्त्यांना नियमित पाणी पुरवठा होत आहे. (पाणी पुरवठा विभाग, महाराष्ट्र शासन) सदर योजना तत्कालीन पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे नेते मा. आर.आर. पाटील यांनी यशस्वीपणे राबविली. महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील पाण्याचा व स्वच्छतेचा प्रश्न सोडविण्यामध्ये ही योजना यशस्वी झाल्याचे दिसते.

**७) महिला आरक्षणाचा विस्तार**

राजकीय सहभागाचे वाढते प्रमाण हे लोकशाही व्यवस्थेच्या यशाचे लक्षण मानले जाते. राजकीय सहभागाच्या वाढत्या प्रमाणामुळे पंचायतराज संस्थाही सक्षम होत आहेत. पंचायतराज संस्थांमधील आरक्षणामुळे समाजातील उपेक्षित, दुर्लक्षित, वंचित वर्गाचा राजकीय सहभाग वाढत आहे. महिलांना पंचायतराज व्यवस्थेत आरक्षण दिले जावे,ही तरतूद ७३ व्या घटनादुरूस्ती मध्ये करण्यात आली होती. त्यानुसार महाराष्ट्रातील पंचायतराज संस्थात महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री मा. शरद पवार यांनी देशात सर्वप्रथम घेतला. सर्वसाधारण महिला पारदर्शकपणाने आणि व्यापक हिताचा विचार करून निर्णय घेतात. त्याचबरोबर महिला आपल्या निर्णयाबाबत त्या निश्चियी असतात.' महिलांना त्यांचे कर्तृत्व सिद्ध करण्यासाठी लागणारी अनुकूल परिस्थिती निर्माण करण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांचीही आहे असे मा. शरद पवार यांचे मत आहे. (पवार शरद,२०१५:१६७ व १६९)

हे महिला आरक्षण ३३ टक्के वरून ५० टक्के करण्याचा निर्णय तत्कालीन ग्रामविकास मंत्री मा. जयंत पाटील यांनी २०११ मध्ये घेतला. त्यामुळे महिलांचा सहभाग वाढून त्याचे सबलीकरण व्हायला त्यातून मदत झाली आहे. महिलासंबंधी असणारे पुरोगामी विचार, राष्ट्रवादी युवती कॉंग्रेसच्या माध्यमातून युवतींना दिलेली नेतृत्वाची संधी, महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे झालेले आर्थिक स्वावलंबन यामुळे महिलांचा राजकीय सहभाग वाढायला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची भूमिका महत्वपूर्ण अशी आहे.

**८) पंचायतराज परिषदेचे आयोजन**

स्थानिक स्वराज्य संस्थाचे विकासातील महत्व व पक्षाच्या विस्तारातील योगदान लक्षात घेवून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने आपल्या पक्षातील ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिका सदस्यांसाठी दोन दिवशीय पंचायतराज परिषद बालेवाडीच्या श्री.शिवछत्रपती क्रिडा संकुलामध्ये आयोजित केली होती. पंचायतराज परिषदेच्या माध्यमातून आपल्या पक्षातील कार्यकर्त्यांना चांगल्या प्रकारची माहिती देण्याचा प्रयत्न राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने केला आहे. या शिबीरामध्ये उपस्थितांना राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे प्रकाशित करण्यात आलेली केंद्र व राज्य



Scanned with CamScanner

ISSN : 2278-9308
July 2021

सरकारचे अर्थ सहाय्य मिळविण्यासाठी असलेली मार्गदर्शिका 'यशस्वी सामाजिक अभियान', राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची 'ग्राम गीता', आदरणीय यशवंतराव चव्हाण साहेबांचे आत्मवृत्त 'कृष्णाकाठ', 'राष्ट्रवादी' मासिक, 'युवती विशेषांक – २०१२', 'पंचायत राज – आज व उद्या' हे वाचण्याचा आग्रह करण्यात आला.

सदर शिबिरामध्ये पक्षाच्या कार्यकर्त्यांनी कसे काम केले पाहिजे याचे मार्गदर्शन विविध मान्यवर नेत्यांनी केले. त्यामध्ये पक्षाचे नेते अजित पवार म्हणतात की, "कोणीही आईच्या पोटातून शिकून बाहेर येत नसतो. आम्ही देखील राजकीय जीवनाला सुरूवात केली तेव्हा आम्हालाही माहिती नव्हते की, आम्ही इतकी मजल गाठू. परंतू जिद्द, चिकाटी, वडिलधाऱ्यांचा मान – सन्मान व एखाद्या विषयातील माहिती नसेल तर, खोलात जावून माहिती घेण्याचा प्रयत्न त्या ठिकाणी आपण करायचा असतो. आज आदरणीय पवार साहेब ७२ वर्षाचे झाले आहेत. आज चार वेळा राज्याचे मुख्यमंत्रीपद, केंद्रातील विविध मंत्रिपदे, विरोधी पक्षनेते पद, अशी अनेक महत्वाची पदे त्यांनी भूषविली आहेत. असे असूनही एखादा नवीन विषय असेल तर ते एखादया तरूणाकडून माहिती घेण्यास कमीपणा मानत नाहीत, संकोच करीत नाहीत. ज्यांच्याकडे जास्त माहिती आहे, त्यांच्याकडून माहिती घेतली पाहिजे. स्वर्गीय यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्षानिमित्त या महाराष्ट्रात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचा घडयाळाच्या चिन्हावर निवडून आलेला सदस्य असेल, पदाधिकारी असेल, तो चांगले काम करू शकतो, हा 'मेसेज' चांद्यापासून बांद्यापर्यंत घरोघरी जाऊन पोहोचला पाहिजे. त्याच्यातून तुम्हाला आपल्या पक्षाला ताकद द्यायची आहे. त्याच्यातून तुम्हाला पक्षाला नवी उभारी द्यायची आहे. पदाधिकाऱ्यांनी काम करताना असे काम केले पाहिजे की, उद्याच्या काळात होणाऱ्या निवडणुकीच्या निमित्ताने घडयाळाचे चिन्ह घेऊन उभा असलेला कोणताही छोटा–मोठा कार्यकर्ता जरी उभा राहिला तरी लोकांना वाटले पाहिजे की, हा पक्ष आपले प्रश्न समजून घेतो. हा पक्ष आपले प्रश्न सोडवितो, हा पक्ष नडीअडीला उपयोगी पडतो ".

पक्षाच्या सामाजिक पाया विस्तारण्यासाठी समाजातील सर्व जातीगटांच्या लोकांना पक्षात सामावून घेतले पाहिजे याची जाणिव पक्षातील नेत्यांना आहे. त्यामुळे शिबीरातील सहभागी सदस्यांना उद्देशून मा. अजित पवार म्हणतात की, "आपण सर्व जातीधर्माच्या लोकांना बरोबर घेऊन चालले पाहिजे. वंचित घटकातील लोकांना, दारिद्रय रेषेखालील लोकांना सक्रिय केले पाहिजे, त्यांना बरोबर घेऊन चालले पाहिजे. कधी कधी त्यांच्यासाठी ज्या योजना असतात, त्याचा लाभ आपण आपल्या नातेवाईकांना द्यायला जातो आणि त्याची किंमत तुम्हाला पक्षाला मोजावी लागते. तुम्ही आता जितके काम कराल, तितका त्याचा फायदा तुम्हाला तुमच्या भावी राजकीय वाटचालीत होणार आहे. तुम्हाला मिळालेल्या पदाचा वापर तुम्ही किती चांगल्या पद्धतीने केला आहे हे तुमच्या कामातून आणि लोकांमध्ये होणाऱ्या चर्चेतून दिसून आले पाहिजे. पक्षासाठी अहोरात्र काम करणाऱ्या पक्षाच्या असंख्य कार्यकर्त्यांच्या जोरावर पक्षाची वाटचाल सुरू असते. हे कोणा एकटया – दुकटयाचे काम नाही, हे कोणा एकटया – दुकटयाचे यश आहे असे आम्ही समजत नाही. ही आपली सामुहिक शक्तीच्याच जोरावर वाटचाल सुरू आहे. आपापल्या भागात आपल्या कार्याचा ठसा उमटवून जनतेच्या हृदयात कसे स्थान मिळविता येईल, यावर सर्व सहकाऱ्यांनी लक्ष दिले पाहिजे आणि हे काम करीत असताना आपल्या कामाचा दर्जा हा चांगला राहिलाच पाहिजे. लोकांशी संपर्क वाढविला पाहिजे. तुमच्या घराची दारे लोकांसाठी २४ तास उघडी असली पाहिजेत".(भोंगळे सुधीर, २०१२ : ११५–१२४)

**निष्कर्ष :–**

पंचायतराज संस्थांच्या सक्षमीकरणात राजकीय पक्षांची भूमिका महत्वपूर्ण अशी असते. राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने जिल्हा परिषदेच्या अधिकारात वाढ करून त्या सक्षम करण्याचा प्रयत्न केला.



Scanned with CamScanner

महिलांना झेंडावंदनाचा अधिकार व महिलांना ५० टक्के आरक्षण देवून त्यांचा पंचायतराज व्यवस्थेतील सहभाग वाढल्याने सक्षम झाली. पंचायतराज व्यवस्थेचे ग्राम विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, यशवंत ग्रामसमृद्धी योजना, जलस्वराज्य योजना महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून राबवून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने ग्रामीण भागाचा विकास केला. त्याचबरोबर पंचायतराज व्यवस्थेतील नेतृत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी पंचायतराज परिषदेचे आयोजन केले. थोडक्यात, अधिकारात वाढ करणे, विकासात्मक योजना राबविणे, महिला सहभागाचे प्रमाण वाढणे, नेतृत्वाचा सकारात्मक विकास करण्यासाठी प्रबोधन करणे या माध्यमातून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने पंचायतराज संस्थांचे सक्षमीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे.

संदर्भ :

1. Mathur M.V and Iqbal Narayan, (1974), 'Panchayati Raj Administration in Maharashtra', Bombay,Popular Prakashan
2. Jal Swarajya review – cse,IIT, Bombay
3. Annual Report to the People on Rural Development (2011-12), Ministry of Rural Development.
4. www.maharashtra.gov.in
5. करडेकर अनिल, (२००९),'महाराष्ट्राची वाटचाल',श्री विद्या प्रकाशन,पुणे
6. साळुंखे श्रीधर, (२००७),'सहदय योद्धा',संस्कृती प्रकाशन,पुणे
7. पाटील व्ही. बी,(२०१९),'महाराष्ट्रातील पंचायतराज व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था,'के'सागर प्रकाशन,पुणे
8. पाटील शिवाजी व लोंढे प्रदीप, (२०१६),'महाराष्ट्रातील पंचायतराज',प्ररूप प्रकाशन,कोल्हापूर
9. लवटे किशोर, (२०१८), 'पंचायतराज', ज्ञानदीप प्रकाशन,पुणे.
10. पवार शरद,(२०१५), लोक माझे सांगाती, राजहंस प्रकाशन,पुणे,
11. भोंगळे सुधीर, (२०१२), 'आरपार: अजित पवार यांची भाषणे',सुज्ञान प्रकाशन,पुणे,
12. महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी अहवाल २०११–१२
13. वाघ गजानन,(२०१२),'तंटामुक्त शैलीचा अपूर्व अविष्कार',लोकराज्य,एप्रिल
14. लोकराज्य, सप्टेंबर २०१६
15. राष्ट्रवादी, २०१५, मार्च, अंक–३
16. लोकराज्य, एप्रिल २०१२
17. दै.सकाळ, ४ जानेवारी २००५



Scanned with CamScanner